सामान्य राज्य सेवा, गट-अ, प्रशासन अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची दि.०१/०१/२०१४ स्थित अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन परिपत्रक क्र. कृषिआ-३३१८/प्र.क्र.६९/१६ अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दि.१९ एप्रिल, २०१८

वाचा :- १) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दिनांक २१/१०/२०११.
२) शासन परिपत्रक,कृषि व व पदुम विभाग क्र. कृषिआ-३३१८/प्र.क्र.६९/१६ अे, दि.०८.०३.२०१८.

परिपत्रक

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील दिनांक २१/१०/२०११ च्या शासन निर्णयान्वये शासनसेवेतील अधिकारी / कर्मचाऱ्यांची ज्येष्ठतासुची प्रत्येक वर्षी तयार करणे व प्रसिध्द करणे याबाबतचे सर्वंकष धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार संदर्भ क्र.२ च्या शासन परिपत्रकान्वये सामान्य राज्य सेवा, गट-अ संवर्गातील प्रशासन अधिकारी संवर्गाची दि.०१/०१/२०१४ स्थित तात्पुरती सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. उपरोक्त दिनांक ०१/०१/२०१४ स्थित तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिध्द केल्यानंतर कोणत्याही प्रशासन अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांकडून आक्षेप प्राप्त झालेले नाही. त्यामूळे शासन निर्णय, साप्रवि, दिनांक २१/१०/२०११ मधील तरतुदीनूसार सामान्य राज्य सेवा, गट-अ, प्रशासन अधिकारी संवर्गाची दिनांक ०१/०१/२०१४ स्थित अंतिम ज्येष्ठतासुची सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ नुसार प्रसिध्द करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत ज्येष्ठतासूचीतील अधिकाऱ्यांच्या नावासमोर नमूद केलेला ज्येष्ठतेचा दिनांक हा शासन अधिसुचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०७६/१२,दिनांक २१/०६/१९८२ नूसार फक्त सामान्य राज्य सेवा, गट-अ, प्रशासन अधिकारी संवर्गातील ज्येष्ठता निश्चित करण्याकरीता विचारात घेण्यात येईल.

४. आयुक्त (कृषि) यांनी सदर अंतिम ज्येष्ठतासूची सर्व संबंधीत सामान्य राज्य सेवा, गट-अ, संवर्गातील प्रशासन अधिकाऱ्यांच्या (रजेवर/प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकाऱ्यांसह) निदर्शनास आणावी व तसे कळविल्याबाबत त्यांची स्वाक्षरी घेतलेली प्रत अभिलेखात ठेवावी.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८०४१९१५३७२८०३०१ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Umesh Madhukar Madan

Digitally signed by Umesh Madhukar Madan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6a20cbbc812f8be8371fb8e96ab39865278090eca38793fc8e3967bd332d3272, cn=Umesh Madhukar Madan
Date: 2018.04.19 15:40:44 +05'30'

(उ.म.मदन)

शासनाचे अवर सचिव

सोबत : प्रपत्र-अ

प्रति,

१) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) सर्व विभागीय कृषि सहसंचालक द्वारा आयुक्त (कृषि),कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे.

३) सहसंचालक (आस्थापना), कृषि आयुक्तालय, पुणे.

४) उपसचिव (१६ अे कार्यासन) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग,मंत्रालय, मुंबई.

५) निवडनस्ती,१६ अे कार्यासन.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दि.२१/१०/२०११ सोबतचे प्रपत्र “अ”										
सामान्य राज्य सेवा गट-अ प्रशासन अधिकारी संवर्गाची दिनांक ०१/०१/२०१४ स्थित अंतिम (Final) ज्येष्ठतासुची										
अ.क्र.	**ज्येष्ठता क्रमांक**	**नांव**	**प्रवर्ग # (नियुक्तीनंतर प्रवर्ग बदलला असल्यास त्याचा दिनांक)**	**जन्मतारीख**	**नियुक्ती दिनांक**	**$ नियुक्तीचा मार्ग (सरळसेवेने/ मर्यादीत विभागीय परिक्षेद्वारे नियुक्त उमेदवारांचा गुणवत्ता क्रमांक व परिक्षेचे वर्ष.)**	**ज्येष्ठता दिनांक/ ज्येष्ठतेचा मानीव दिनांक**	**सेवानिवृत्तीचा दिनांक**	**शैक्षणिक अर्हता @**	**अभिप्राय**
१	**२**	**३**	**४**	**५**	**६**	**७**	**८**	**९**	**१०**	**११**
१	९	मोतीलाल भैयालाल कायदेकर	अनु.जमाती	०७.०१.१९५६	१७.०६.२००६	पदोन्ती	-	३१.०१.२०१४		-
२	१२	अशोक धोंडू नाईक	अनु.जमाती	०१.०६.१९६०	०६.१०.२००७	पदोन्ती	-	३१.०५.२०१८	एम.कॉम	व.प्र.अ.पदोन्नती दि.०८.१०.२०१३
३	१६	देवजी गोपा कान्हेर	भ.ज.(ब)	०६.०७.१९५६	०९.०३.२००७	तदर्थ पदोन्ती	-	३१.०७.२०१४	बी.ए.एल.एल.बी.	-
खंड दिनांक ०१.०१.२०१३ ते दिनांक ३१.१२.२०१३										
४	१७	श्री. विक्रम खोब्राजी भालशंकर	अनु.जाती	०३.०५.१९५८	३०.०९.२०१३	नियमित पदोन्नती	-	३१.०५.२०१६	एम.ए.	-
५	१८	श्री. राजेश्वर मोरेश्वर शिरसाठ	अनु.जाती	१६.०२.१९५७	२४.०९.२०१३	नियमित पदोन्नती	-	२८.०२.२०१५	बी.ए.	-
६	१९	श्रीमती दुर्गावती रमेश मखरे	अनु जमाती	१७.११.१९६०	२४.०९.२०१३	नियमित पदोन्नती	-	३०.११.२०१८	बी.ए.	